MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

● वर्ष : १५ अंक : ३ पाने : ८ ● एप्रिल-मे २०२१ ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

'तौक्ते' चक्रीवादळाने व मुसळधार पावसामुळे ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व राज्यातील इतर जिल्ह्यातील वीजयंत्रणेचे नुकसान झाले. दरम्यान, खंडित झालेला वीजपुरवठा महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर सुरळीत केला. त्याबददल अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनापासून अभिनंदन! विशेष म्हणजे याबद्दल मा. ऊर्जामंत्री महोदयांनीही कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. तसेच महाराष्ट्र सरकारने चक्रीवादळानंतर ज्या पध्दतीने वेगाने वीजपुरवठा सुरळीत केला, त्याचे कौतुक केंद्रीय ऊर्जा सचिवांनीही केले आहे.

- **टीमवर्कमुळे चक्रीवादळावर केली मात**
- **अधिकारी, कर्मचाऱ्यांचे काम कौतुकास्पद**
- **योग्य नियोजन, समन्वयामुळे यश**
- **आणखीन वीजवाहिन्यांचे जाळे वाढणार**

चक्रीवादळाची शक्यता लक्षात घेऊन मा. ऊर्जामंत्री महोदयांनी कृती आराखडा तयार करून विविध ठिकाणी नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. तसेच अधिकाधिक मनुष्यबळ या कामी लावण्याचे व लागणारी पुरेशी सामुग्री उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आपण योग्य अंमलबजावणी केली. मुख्य अभियंते व अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्क साधून योग्य त्या सूचना देऊन कामाबाबत वारंवार पाठपुरावा केला.

नैसर्गिक आपत्तीमध्ये वीजपुरवठा खंडित झाल्यास सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी व्यवस्थेतून वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सोबत यंत्रणा दुरूस्तीचे काम देखील युध्दपातळीवर केले. सध्या कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीमुळे प्रामुख्याने कोविड रूग्णालये, ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प व रिफीलिंग उदयोग, विलगीकरण कक्ष, लसीकरण केंद्रे, पाणीपुरवठा, मोबाईल टॉवर्स, रेल्वे व अत्यावश्यक सेवांचा वीजपुरवठा अखंडित राहण्यासाठी प्राधान्य दिले.

चक्रीवादळात हवेच्या तीव्र जोरामुळे २२० के. व्ही. बॉम्बे डाईंग-सहारा वाहिनीच्या मनोऱ्याच्या वरच्या टोकाला असलेली अर्थ वायर वाहिनीवर पडली. सदरील दोन मनोऱ्यादरम्यान मोठी नदी होती. या परिस्थितीतही मुसळधार पाऊस असताना आपल्या अधिकाऱ्यांनी रात्रीच दुरूस्ती करून वाहिनी पूर्ववत केली. मुंबई परिसराला वीजपुरवठा करणारी ४०० के. व्ही. कळवा-तळेगाव ही वाहिनी बंद पडली होती. उपकेंद्रातील सुरक्षा प्रणालीनुसार सदरील बिघाड हा कळवा उपकेंद्रापासून ३८ किलोमीटर अंतरावर माथेरान येथील डोंगरादरम्यान होता. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रात्री युध्दपातळीवर कामाचे नियोजन करून सकाळी वीजवाहिनी सुरू केली. ४०० के. व्ही. कळवा-पडघे या वाहिनीची अर्थवायर विद्युत तारावर पडून विद्युत वाहिनी बंद पडली. बिघाडाचे ठिकाण तळोजा रेल्वेक्रॉसिंगजवळ होते. तसेच चक्रीवादळामुळे झाडे पडल्याने रस्ते बंद होते. अधिकाऱ्यांनी रेल्वे विभागाशी तत्काळ संपर्क साधून भरपावसात अर्थ वायरचा अडथळा दूर केला. त्यामुळे ४०० के. व्ही. कळवा-पडघे ही वाहिनी पूर्ववत केली.

२२० के. व्ही. टेमघर या उपकेंद्रात अतिवृष्टी व वादळामुळे रात्री दोन वाजता विद्युत उपकरणे नादुरूस्त झाली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्वरित कार्यवाही करून रात्री साडेतीन वाजता टेमघर वाहिनी व उपकेंद्राचा विद्युत पुरवठा पूर्ववत केला. पडघे, कळवा, कलरकेम, बोईसर, आपटा, उरण, कुडूस, डोंबिवली, वसई, ट्रॉम्बे, बोरिवली, नागोठाणे व इतर उपकेंद्रातील संबंधित अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत कठीण परिस्थितीतही ऑक्सिजन कारखाने, कोविड केंद्रे यांना विद्युत पुरवठा अखंडित ठेवला.

१०० के. व्ही. तळोजा येथून दोन वाहिन्या लिंडे ऑक्सिजन कारखान्यास वीजपुरवठा करतात. या दोन्ही वाहिन्या एकाचवेळी बंद पडून ऑक्सिजन कारखान्याचा वीजपुरवठा खंडित झाला होता. दरम्यान, संबंधित कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर अवघ्या ४५ मिनिटांत विद्युत पुरवठा पूर्ववत केला. चक्रीवादळाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी महापारेषणने योग्य प्रकारचे नियोजन व दक्षता घेतली होती. तसेच तिन्ही वीज कंपन्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमधील समन्वय व संपर्कामुळे वीजपुरवठा सुरळीत राखता आला, हे मला आवर्जुन सांगावेसे वाटते.

गेल्यावर्षी निसर्ग चक्रीवादळ आले, यावर्षी तोक्ते चक्रीवादळ आले. जागतिक वातावरण बदल आणि इतर भौगोलिक कारणामुळे दरवर्षी असे चक्रीवादळ येण्याची शक्यता गृहीत धरावी लागणार आहे. चक्रीवादळाचा इशारा येईल आणि मग आपण नियोजन करू, यापेक्षा आता दरवर्षी मान्सूनच्या तोंडावर चक्रीवादळ येणार हे गृहीत धरून नियोजन केले पाहिजे. वादळामुळे आपले कमीत-कमी नुकसान होईल आणि वीजपुरवठा तत्काळ पूर्ववत करता येईल यासाठी कायमस्वरूपी नियोजन व आदर्श कार्यप्रणाली (एसओपी) तयार केली पाहिजे. तसे निर्देशही मा. ऊर्जामंत्री महोदयांनी दिले आहेत. ग्राहकांना योग्य दाबाचा व अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी येत्या पाच वर्षात राज्यात विविध ठिकाणी उपकेंद्रे, अति उच्चदाब वीजवाहिन्यांचे जाळे व इतर विविध कामे करण्याचे प्रस्तावित आहेत. मेळघाटसारख्या दुर्गम भागातही



**दिनेश वाघमारे** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

योग्य दाबाचा वीजपुरवठा करण्यात यावा व दुर्गम भागातील एकही गाव अथवा पाडा अंधारात राहू नये, यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

सन २०१९-२०२० ते २०२४-२०२५ या पाच वर्षात राज्यात एकूण ८७ अति उच्चदाब वीज उपकेंद्रे उभारण्यात येणार आहेत. यामुळे ३० हजार एमव्हीए एवढी क्षमता वाढ होणार आहे. तर १० हजार ७०७ कि.मी. एवढ्या लांबीच्या अति उच्चदाब वाहिन्यांचे नवीन जाळे निर्माण होणार आहे. यासाठी १० हजार ८२३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

विशेष म्हणजे सामाजिक बांधीलकीच्या नात्याने महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गोळा केलेला एक दिवसाचा पगार सुमारे १ कोटी ४२ लाख रूपयांचा धनादेश लवकरच आपण मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देणार आहोत. सांघिक सामाजिक जबाबदारी (CSR) फंडातून आणखी काही मदत देता येईल का? याचाही विचार प्राधान्याने सुरू आहे. ऊन, वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगणारे...स्वत:चा जीव धोक्यात घालून तारेवरची जीवघेणी कसरत करणारे...अंधाराशी युध्द करून घराघरात प्रकाश पोहोचवणारे मोडून पडलेल्या यंत्रणेला पुन्हा उभारी देणाऱ्या महापारेषणच्या जिगरबाज कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे कौतुक नक्कीच आहे. भविष्यातही असेच चांगले काम कराल, असा मला विश्वास आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

■ तोक्ते चक्रीवादळाने झालेल्या नुकसानीचा ऊर्जामंत्र्यांनी घेतला आढावा ■

# चक्रीवादळांचा मुकाबला करण्यासाठी कायमस्वरूपी नियोजन करा : डॉ. नितीन राऊत

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण/ टीम महानिर्मिती, मुंबई*

जागतिक वातावरणात होणारे बदल लक्षात घेता दरवर्षी मान्सूनच्या पूर्वी चक्रीवादळ येण्याची शक्यता गृहीत धरून या वादळाने कमीत-कमी नुकसान व्हावे आणि वादळ येऊन गेल्यानंतर वीजपुरवठा पुन्हा सुरळीत करण्यासाठी कायमस्वरूपी नियोजन आणि कार्यप्रणाली तयार करण्याचे निर्देश ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊत यांनी दिले आहेत.

'तोक्ते' चक्रीवादळ येऊन गेल्यावर वीजयंत्रणांच्या झालेल्या नुकसानीचा आणि मान्सूनपूर्व तयारीचा आढावा दूरदृश्य प्रणालीव्दारे (व्हीसी) बैठक घेऊन ऊर्जामंत्री यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे, मराविमं सूत्रधारी कंपनीचे सल्लागार श्री. उत्तम झाल्टे, महावितरणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे हे मंत्रालयातून तर महावितरणचे सर्व प्रादेशिक संचालक व मुख्य अभियंता, महापारेषणचे सर्व मुख्य अभियंता हे व्हीसीव्दारे उपस्थित होते.

"गेल्यावर्षी निसर्ग चक्रीवादळ आले, यावर्षी तोक्ते चक्रीवादळ आले. जागतिक वातावरण बदल आणि इतर भौगोलिक कारणामुळे दरवर्षी असे चक्रीवादळ येण्याची शक्यता गृहीत धरावी लागणार आहे. चक्रीवादळाचा इशारा येईल आणि मग आपण नियोजन करू यापेक्षा आता दरवर्षी मान्सूनच्या तोंडावर चक्रीवादळ येणार हे गृहीत धरून नियोजन करा. वादळामुळे आपले कमीत-कमी नुकसान होईल आणि वीजपुरवठा तात्काळ पूर्ववत करता येईल यासाठी कायमस्वरूपी नियोजन व आदर्श कार्यप्रणाली (एसओपी) तयार करा," असे निर्देश त्यांनी बैठकीत दिले.

दरवर्षी पाऊस आल्यावर अनेक ठिकाणी वीज जाते. हे टाळण्यासाठी पावसाळी पूर्वतयारीचा भाग म्हणून पाऊस झाल्यावरही वीजपुरवठा कायम रहावा यासाठी आपत्कालीन योजना तयार करा, अशा सूचना त्यांनी केल्या. तसेच एखाद्या ठिकाणी वीज गेल्यास तिथे वीजपुरवठा करण्याचे अन्य पर्याय काय असतील, याचाही आराखडा तयार करा, असे



ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत म्हणाले.

पालघरमधील वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या आघाडीवर नेमकी काय प्रगती आहे, याबद्दल त्यांनी बैठकीत विशेष चर्चा केली. अधिकाऱ्यांकडून तेथील कामाच्या सद्यस्थितीची माहिती घेऊन त्यांनी पालघरचे पालकमंत्री श्री. दादाजी भुसे यांना दूरध्वनीवर संपर्क साधून ते वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या कामाबाबत समाधानी आहेत का? याची चौकशी केली. श्री. भुसे यांनी दिलेल्या सूचनांवर कार्यवाही करण्याचे आदेशही त्यांनी दिले. पालघरमध्ये महावितरणकडे झाडे कापण्याची यंत्रे नसल्याच्या तक्रारीवरून त्यांनी अधिकाऱ्यांना जाबही विचारला.

"तोक्ते वादळ व यापूर्वी आलेल्या निसर्ग चक्रीवादळात महावितरण व महापारेषणच्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी चांगले काम केले आहे. त्याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो," अशा शब्दांत त्यांनी सर्वांचे कौतुक केले.

"खंडित झालेला वीजपुरवठा आपण लवकरात लवकर पूर्ववत करतो हे जरी आकडेवारीवरून खरे असले तरी बऱ्याच ठिकाणी फील्डवर वेगळी परिस्थिती असते. याबाबत आमदार, खासदार व इतर माहिती अधिकार कार्यकर्ते व पत्रकार आपल्या फील्डवरील अधिकाऱ्यांना फोन व दूरध्वनी करीत असतात, परंतू काही अधिकारी फोनही उचलत नाहीत व दादही देत नाहीत, अशा तक्रारी मला प्राप्त झाल्या आहेत. अशा काही तक्रारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना देत असून त्यावर चौकशी करून १५ दिवसांत अहवाल सादर करावा", असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

## चक्रीवादळ रोधक यंत्रणा उभारण्यासाठी अभ्यास


राज्यात चक्रीवादळ येऊन वीजपुरवठा खंडित होऊ नये म्हणून चक्रीवादळरोधक वीज पायाभूत सुविधा कशा उभारता येतील, याचा अभ्यास सध्या सुरू आहे. या विषयावर केंद्र सरकारसोबत नियमित चर्चा सुरू असल्याचे ऊर्जा सचिव श्री. दिनेश वाघमारे यांनी या बैठकीत सांगितले.

## केंद्र सरकारने केले कौतुक

महाराष्ट्र सरकारने चक्रीवादळानंतर ज्या पध्दतीने वेगाने वीजपुरवठा सुरळीत केला, त्याचे कौतुक केंद्रीय ऊर्जा सचिवांनी केले आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांनी या बैठकीत दिली. महावितरणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी यावेळी एक सादरीकरण करून महावितरणने यासाठी काय केले याची माहिती दिली. "या चक्रीवादळाचा मुकाबला करण्यासाठी महावितरण, महापारेषण यांच्यासह मुंबईतील बेस्ट, अदानी, टाटा यांच्यासारख्या संस्थांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेला एक कोअर गट स्थापन करण्यात आला. याशिवाय २४ तास सक्रिय असलेले एक नियंत्रण कक्ष महावितरणच्या मुख्यालयात स्थापन करण्यात आले. ऑक्सिजन प्रकल्प, रुग्णालये यांचा वीजपुरवठा खंडित होऊ नये याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले," असे श्री. ताकसांडे यांनी सांगितले.







**Team Work** ■ *अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केले कौतुक* ■

# चक्रीवादळात महापारेषणची जिगरबाज कामगिरी

■ **टीम महापारेषण, मुंबई**

'तौक्ते' चक्रीवादळाने व मुसळधार पावसामुळे ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर व राज्यातील इतर जिल्ह्यातील वीजयंत्रणेचे नुकसान झाले. दरम्यान, खंडित झालेला वीजपुरवठा महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर सुरळीत केला. याबद्दल ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

चक्रीवादळाची शक्यता लक्षात घेऊन ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी कृती आराखडा तयार करून विविध ठिकाणी नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. तसेच अधिकाधिक मनुष्यबळ या कामी लावण्याचे व लागणारी पुरेशी सामुग्री उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्री. श्रीकांत राजूरकर यांनी संबंधित मुख्य अभियंते व अधिकारी यांच्याशी संपर्क साधून योग्य त्या सूचना देऊन कामाबाबत वारंवार पाठपुरावा केला.

नैसर्गिक आपत्तीमध्ये वीजपुरवठा खंडित झाल्यास सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी व्यवस्थेतून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे सोबत यंत्रणा दुरूस्तीचे काम देखील युध्दपातळीवर करण्याचे आदेश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिले होते. सध्या कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीमुळे प्रामुख्याने कोविड रूग्णालये, ऑक्सिजन





निर्मिती प्रकल्प व रिफीलिंग उदयोग, विलगीकरण कक्ष, लसीकरण केंद्रे, पाणीपुरवठा, मोबाईल टॉवर्स, रेल्वे व अत्यावश्यक सेवांचा वीजपुरवठा अखंडित राहण्यासाठी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी निर्देश दिले होते.

हवेच्या तीव्र जोरामुळे २२० के. व्ही. बॉम्बे डाईंग-सहारा वाहिनीच्या मनोऱ्याच्या वरच्या टोकाला असलेली अर्थ वायर वाहिनीवर पडली. सदरील दोन मनोऱ्यादरम्यान मोठी नदी होती. या परिस्थितीतही मुसळधार पाऊस असताना महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रात्रीच दुरूस्ती करून वाहिनी पूर्ववत केली.

मुंबई परिसराला वीजपुरवठा करणारी ४०० के. व्ही. कळवा-तळेगाव ही वाहिनी बंद पडली होती. उपकेंद्रातील सुरक्षा प्रणालीनुसार सदरील बिघाड हा कळवा उपकेंद्रापासून ३८ किलोमीटर अंतरावर माथेरान येथील डोंगरादरम्यान होता. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रात्री युध्दपातळीवर कामाचे नियोजन करून सकाळी वीजवाहिनी सुरू केली.

४०० के. व्ही. कळवा-पडघे या वाहिनीची अर्थवायर विद्युत तारावर पडून विद्युत वाहिनी बंद पडली. बिघाडाचे ठिकाण तळोजा रेल्वेक्रॉसिंगजवळ होते. तसेच चक्रीवादळामुळे झाडे पडल्याने रस्ते बंद होते. दरम्यान, महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी रेल्वे विभागाशी तात्काळ संपर्क साधून भरपावसात अर्थ वायरचा अडथळा दूर केला. त्यामुळे ४०० के. व्ही. कळवा-पडघे ही वाहिनी पूर्ववत करण्यात आली.

२२० के. व्ही. टेमघर या उपकेंद्रात अतिवृष्टी व वादळामुळे रात्री दोन वाजता विद्युत उपकरणे नादुरूस्त झाली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्वरित कार्यवाही करून रात्री साडेतीन वाजता टेमघर वाहिनी व उपकेंद्राचा विद्युत पुरवठा पूर्ववत केला. पडघे, कळवा, कलरकेम, बोईसर, आपटा, उरण, कुडूस, डोंबिवली, वसई, ट्रॉम्बे, बोरिवली, नागोठाणे व इतर उपकेंद्रातील संबंधित अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत कठीण परिस्थितीतही ऑक्सिजन कारखाने, कोविड केंद्रे यांना विद्युत पुरवठा अखंडित ठेवला. १०० के. व्ही. तळोजा येथून दोन वाहिन्या लिंडे ऑक्सिजन कारखान्यास वीजपुरवठा करतात. या दोन्ही वाहिन्या एकाचवेळी बंद पडून ऑक्सिजन कारखान्याचा वीजपुरवठा खंडित झाला होता. दरम्यान, संबंधित कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर अवघ्या ४५ मिनिटांत विद्युत पुरवठा पूर्ववत केला. चक्रीवादळाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी महापारेषणने योग्य प्रकारचे नियोजन व दक्षता घेतली होती. तसेच तिन्ही वीज कंपन्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमधील समन्वय व संपर्कामुळे वीजपुरवठा सुरळीत राखता आला, याबद्दल ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी अभिनंदन केले आहे.



# भारतीय ऊर्जा क्षेत्राच्या विकासाचे शिल्पकार

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून सारे जग ओळखते. मात्र, फार कमी लोकांना हे माहित आहे की देशात ऊर्जा क्षेत्राचा आज जो विकास झालेला आहे, त्याचा पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रचला आहे. भारताचे पहिले ऊर्जामंत्री म्हणून बाबासाहेबांच्या या कार्याची ओळख करून देत आहेत, राज्याचे ऊर्जामंत्री **डॉ. नितीन राऊत**

दुसऱ्या विश्व युध्दाच्यावेळी संरक्षणविषयक सामुग्री तयार करणाऱ्या विविध कारखान्यांना व उद्योगांना वीजपुरवठा करण्याची गरज निर्माण झाली. त्यासाठी तत्कालीन भारत सरकारने सन १९४१ मध्ये विद्युत आयोगाची (इलेक्ट्रिकल कमिशन) स्थापना केली. १९४२ ते १९४६ या काळात बाबासाहेब व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात मंत्री होते आणि वीज, जलसंपदा व कामगार विभागांचे खाते सांभाळत होते. जुलै १९४२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जेव्हा कामगारमंत्री झाले तेव्हा विद्युत निर्मिती हा विभाग कामगार खात्यांतर्गतच महत्त्वाचा विभाग म्हणून कार्यरत होता. त्यावेळेस वीज वितरण आणि वीजविषयक कामकाजाचे प्रशासन यांच्याबाबत धोरण असो की माहिती, काहीच अस्तित्वात नव्हते. भारताची युद्धोत्तर पुनर्उभारणी करण्यासाठी एक योजना तयार करण्यात आली. त्याअंतर्गत देशात वीजनिर्मिती आणि ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी धोरण आखणी व नियोजन करण्याची सुरूवात करण्यात आली. पुनर्उभारणी समितीच्या अंतर्गत विविध समित्या कार्यरत होत्या. एक होती शासकीय अधिकाऱ्यांची समिती व तिचे अध्यक्ष होते कामगार विभागाचे सचिव. तांत्रिक विषयांशी संबंधित तज्ज्ञांची एक समिती होती. अर्थतज्ज्ञांची एक सल्लागार समिती होती. सर्वात महत्त्वाची समिती होती धोरण समिती आणि कामगारमंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समितीचे अध्यक्ष होते.

ऊर्जा क्षेत्रासमोरील प्रमुख प्रश्नांचा अभ्यास करणे आणि त्या सोडवण्यासाठी उपाययोजनांची शिफारस करणे, हे या धोरण समितीचे काम होते. सप्टेंबर १९४३ मध्ये या धोरण समितीची स्थापना करण्यात आली. विजक्षेत्राचे प्रशासन, वीज निर्मिती व वितरण करण्यात येणाऱ्या प्रमुख अडचणी हा तेव्हा प्रमुख चिंतेचा विषय होता. या अडचणी लक्षात घेऊन ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी भारत सरकारला मार्गदर्शन ठरतील, अशा तत्त्वांची शिफारस करणे, ही जबाबदारी धोरण समितीवर सोपविण्यात आली होती. २५ ऑक्टोबर १९४३ रोजी या समितीची पहिली तर २ फेब्रुवारी, १९४५ रोजी दुसरी बैठक झाली. या दोन बैठकींमध्ये पूर्णवेळ वीज निर्मितीच्या समस्यांचा सखोल अभ्यास करण्यात आला. ऊर्जा क्षेत्राच्या विकासाचे धोरण हे देशभरातील सर्व प्रमुख घटक वा समस्या यांचा विचार करून तयार केले जावे, यासाठी देशातील सर्व राज्ये व प्रांतांची या विषयावर मते मागवण्यात आली. या सर्व अभ्यासातून डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील समितीने जे नवे धोरण आखले ते आजही ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी केले जात असलेल्या सर्व प्रयत्नांचा पाया आहे. त्यावरून डॉ. आंबेडकरांनी ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी केलेले काम किती श्रेष्ठ दर्जाचे आणि दूरदृष्टीचे आहे, हे लक्षात येते.

### ऊर्जा क्षेत्राच्या विकासासमोरील आव्हाने

"स्वस्त आणि पुरेशा विजेची उपलब्धता केवळ एका केंद्रीकृत व्यवस्थेव्दारे होऊ शकते. स्वस्त वीज उपलब्ध झाल्याशिवाय औद्योगिक प्रगती घडणार नाही आणि त्याशिवाय कोट्यवधी भारतीय दारिद्र्याच्या दृष्टचक्रातून बाहेर पडू शकणार नाही," ही बाबासाहेबांची भूमिका होती. बाबासाहेब विजेकडे केवळ एक तांत्रिक बाब म्हणून न पाहता दारिद्र्य मुक्तीचा आणि प्रगतीचा मार्ग म्हणून बघत

सर्व अभ्यासातून डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील समितीने जे नवे धोरण आखले ते आजही ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी केले जात असलेल्या सर्व प्रयत्नांचा पाया आहे. त्यावरून डॉ. आंबेडकरांनी ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी केलेले काम किती श्रेष्ठ दर्जाचे आणि दूरदृष्टीचे आहे, हे लक्षात येते.



होते, हे त्यांच्या द्रष्टेपणाचे वेगळेपण.

विजेवर मालकी सरकारची असावी की खासगी? खासगी मालकी असेल तर जनतेचे हित जपण्यासाठी काही अटी घालण्याची गरज आहे का? ऊर्जा क्षेत्राच्या विकासाची जबाबदारी ही केंद्र सरकारची असावी की राज्य सरकारची? जर केंद्र सरकारची जबाबदारी असेल तर स्वस्त आणि मुबलक वीजपुरवठा करण्यासाठी आणि संसाधनांचा अपव्यय टाळण्यासाठी प्रशासनाची सर्वात प्रभावी पध्दत कोणती असेल? जर जबाबदारी राज्य सरकारांची असेल तर राज्यांचे प्रशासन हे आंतर-प्रांतीय मंडळाच्या अधीनस्थ असावे की नाही? या प्रश्नांचे चिंतन करून प्रभावी उपाय डॉ. आंबेडकरांनी सुचविले.

स्वातंत्र्यपूर्व काळात विजक्षेत्रात खासगी क्षेत्राची मक्तेदारी होती. आणि वीज क्षेत्र हे विकेंद्रित होते. डॉ. आंबेडकर समितीने केंद्रीकृत व्यवस्था उभारण्याला प्राधान्य देण्याची आणि वीजनिर्मिती क्षेत्रात सरकारी क्षेत्राची मक्तेदारी असावी, अशी भूमिका घेतली.

अ) प्रादेशिक वा राज्य पातळीवर विद्युत क्षेत्राचा विकास करणे आणि जास्तीत जास्त आर्थिक विकासासाठी ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देणे आणि अशा विकासाची निरोगी वाढ रोखणाऱ्या सध्याच्या व्यवस्थेतील घटकांचे निर्मूलन करणे,

ब) देशातील अनेक महत्त्वाच्या वीज विकास उपक्रमांसाठी लागणाऱ्या अतिरिक्त अवजड ऊर्जा उपकरणांसाठी उत्पादन क्षमता निर्माण होईल याची काळजी घेणे.

देशात विजेची गरज पूर्ण करण्यासाठी संपूर्ण भारतासाठी केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय डॉ. आंबेडकरांनी घेतला. त्याची उद्दिष्टे खालीलप्रमाणे होती.

अ) संबंधित प्रांतीय आणि राज्य सरकारांशी सल्लामसलत करून देशभरात विद्युत ऊर्जा विकासासाठी योजना सुरू करणे, समन्वय साधणे आणि नव्या योजना सुचविणे.

ब) वीजपुरवठा आणि संबंधित अडचणीवर मात करण्यासाठी मानकीकरण, चाचणी आणि संशोधन यासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने सुसज्ज संस्था स्थापन करणे.

क) वेगवान विकास आणि विजेच्या वापरास भारतीयांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांना ऊर्जेबाबत शिक्षित करणे.

या धोरणामुळे विजेचा औद्योगिक वापर करण्याला प्राधान्य देण्याचे केंद्र सरकारने ठरवले. त्यानुसार विजेचा वापर वाढविण्यासाठी खतनिर्मिती प्रकल्पांची सुरूवात करण्यात आली. विजक्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास करण्यासाठी भारतीय अभियंत्यांना विदेशात पाठवून प्रशिक्षित करण्याचा निर्णयही घेण्यात आला आणि भारतीय अभियंत्यांना युरोप, अमेरिका, कॅनडा इत्यादी देशात पाठवण्यातही आले. यासाठी नोव्हेंबर १९४४ मध्ये “केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळ” स्थापन करण्यात आले ज्याचे नाव कालांतराने केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीईए) असे करण्यात आले. विद्युत आणि ग्रीड प्रणालीच्या क्षेत्रीय विकासाची आवश्यकता असल्याची भूमिकाही त्यांनी मांडली. भविष्यात अशा आंतर-प्रादेशिक ग्रीडला एकमेकांशी जोडून एक राष्ट्रीय ग्रीड तयार केले जाऊ शकते. असे झाल्यास अतिरिक्त वीज उपलब्ध असलेल्या विभागांकडून विजेची टंचाई असलेल्या विभागांकडे वीज सहजपणे पोहोचू शकेल, अशी त्यांच्या द्रष्टेपणाची ओळख देणारी शिफारस त्यांनी केली होती.

डॉ. आंबेडकर समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारावर विद्युत पुरवठा कायदा १९४८ साली करण्यात आला. देशात ऊर्जेच्या विकासाचा, नियंत्रणाचा पाया याच कायद्याच्या माध्यमातून घालण्यात घाला. आज भारतात संपूर्ण विद्युतीकरण झालेला देश हा गौरव प्राप्त करण्यास पोहोचला, त्याला कारण म्हणजे डॉ. आंबेडकरांनी आखलेले धोरण.

३१ डिसेंबर २०१३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे स्वप्न प्रत्यक्षात आले. ‘एक राष्ट्र, एक ग्रीड आणि एक वारंवारिता’ (One Nation, One Grid, One Frequency) या त्यांच्या संकल्पनेनुसार राष्ट्रीय ग्रीडची स्थापना करण्यात आली. त्यामुळे आज देशभरात कुठेही विजेची कमतरता असेल तर लगेच दुसऱ्या भागातील अतिरिक्त वीज त्यांना उपलब्ध होते.

बाबासाहेबांनी हा देश केवळ राज्यघटनेच्या माध्यमातूनच एकत्र बांधला असे नव्हे तर विजेच्या तारांच्या रूपानेही त्यांनी भारताला एकसंघ करून प्रगतीची ऊर्जा देशात निर्माण केली. त्यामुळेच बाबासाहेब केवळ राज्यघटनेचेच नव्हे तर देशाच्या ऊर्जा विकासाचेही शिल्पकार होते, हे स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेल्या पायवाटेवर चालत महाराष्ट्रातील सर्व वीज ग्राहकांना वेगवेगळ्या उपाययोजना करून स्वस्त वीज पुरवण्यासाठी सर्वतोपरी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहे. हे एक कठीण कार्य आहे, याची मला कल्पना आहे. परंतु मला खात्री आहे की, एक पध्दतशीर, व्यावसायिक दृष्टिकोन अवलंबून, संसाधनांचा सर्वोत्तम वापर करून, काटेकोर उपाययोजना आखून, अत्याधुनिक साधनांचा वापर करून, कारभारात पारदर्शकता आणून आणि सर्व भागधारकांना त्यात सामील करून आत्मविश्वासाने मी माझ्या प्रयत्नात नक्की यशस्वी होईल.



**पालघर :** महापारेषण कंपनीने प्रस्तावित केलेल्या ४०० के. व्ही. जी.आय.एस. उपकेंद्र वेळगाव, बोईसरच्या उभारणीकरिता संपादित करावयाच्या जमिनीसंदर्भात प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी लालोंडे, कुकडे परिसरातील प्रस्तावित जमिनींची पाहणी केली. सोबत महापारेषणचे वरिष्ठ अधिकारी.



**कुडूस :** येथील ४०० के. व्ही. कुडूस उपकेंद्राची पाहणी करताना प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे. सोबत महापारेषणचे वरिष्ठ अधिकारी.

### ■ प्रस्तावित वेळगाव व बोईसरच्या प्रकल्पाची केली पाहणी ■

# ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे यांनी दिली प्रकल्पाला भेट

■ *टीम महापारेषण, वाशी*

महापारेषण कंपनीने प्रस्तावित केलेल्या ४०० के. व्ही. जी.आय.एस. उपकेंद्र वेळगाव, बोईसरच्या उभारणीकरिता संपादित करावयाच्या जमिनीसंदर्भात प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी पालघर तालुक्यातील लालोंडे, कुकडे परिसरातील प्रस्तावित जमिनींची पाहणी केली.

दरम्यान, ४०० के. व्ही. जी.आय.एस. उपकेंद्राकरिता येणाऱ्या ४०० के. व्ही.च्या विद्युत वाहिन्या आणि सदर उपकेंद्रातून जाणाऱ्या प्रस्तावित २२० के. व्ही. विद्युत वाहिन्या यांची सविस्तर माहिती करून घेतली. तसेच जमीन संपादनाच्या बाबतीत योग्य मार्गदर्शन केले.

तद्नंतर प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी २२० के. व्ही. बोईसर उपकेंद्राला भेट देऊन पाहणी केली. अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन मार्गदर्शन केले. तसेच तौक्ते चक्रीवादळाच्या वेळी बोईसर उपकेंद्रामध्ये बिघाड झालेल्या २०० एमव्हीए आय.सी.टी. ची पाहणी करून अंतर्गत परीक्षण कसे केले जाते, याची माहिती घेतली.

बोईसर विभागांतर्गत तसेच कळवा मंडळ येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोविड-१९ च्या काळात तसेच तौक्ते चक्रीवादळादरम्यान केलेल्या कामांचे कौतुक केले. यावेळी संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, कार्यकारी संचालक (पारेषण) श्रीकांत राजूरकर, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता नसीर कादरी, मुख्य अभियंता (स्थापत्य) मोतीसिंह चौहान, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी तथा अधीक्षक अभियंता सुनील सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता महेश भागवत, अनिल भारसाकळे, भूषण बल्लाळ, मोरेश्वर ढोरे यांच्यासह इतर कार्यकारी अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## गर्जा महाराष्ट्र माझा...

# महाराष्ट्र दिन व कामगार दिन महापारेषणमध्ये उत्साहात साजरा




■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत ६१ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीला महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर सोशल डिस्टन्सिंग पाळून महापारेषणचे इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.






### महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची निवृत्ती माहे एप्रिल-मे २०२१

## निवृत्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. दिपक कृष्णराव रोकडे | अधीक्षक अभियंता | सांघिक कार्यालय, मुंबई | ३१.०५.२०२१ |
| २. | श्रीमती छाया प्रभाकर साळे | अधीक्षक अभियंता | अउदा संवसु मंडल, कराड | ३१.०५.२०२१ |



■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

सुरूवातीला महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. याप्रसंगी कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. अनिल कालेकर, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक विचार सांगितले.

अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या मोबाईलवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा डीपी (डिजिटल फोटो) म्हणून ठेवून अनोख्या पध्दतीने अभिवादन केले.

ठिकठिकाणी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. काही अधिकाऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांचे वाचन केले. तर काही कर्मचाऱ्यांनी भीमगीते गाऊन अनोख्या पध्दतीने जयंती साजरी करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.



**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दीपप्रज्वलन करून अभिवादन करताना महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर





**मुंबई :** महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे.

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

# महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

सुरुवातीला महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) तथा मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे उपस्थित होते.

अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या मोबाईलवर महात्मा बसवेश्वर यांची प्रतिमा डीपी (डिजिटल फोटो) म्हणून ठेवून अनोख्या पध्दतीने अभिवादन केले. कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करून सामाजिक अंतर (Social Distancing) राखून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



From the Desk of ED, HR

# हम होंगे कामयाब...

कोरोना महामारीच्या काळातही महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा पगार सुमारे १ कोटी ४२ लाख रूपये जमा केले आहेत. लवकरच ते व्यवस्थापनातर्फे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या हस्ते मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीला त्या रकमेचा धनादेश दिला जाणार आहे. यापूर्वीही कोल्हापूर, सांगली येथील महापूराच्यावेळीही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मदतीचा हात दिला होता.

कोविड-१९ महामारीच्या विरोधात लढण्यासाठी महापारेषणनेही पुढाकार घेतला आहे. सर्व परिमंडळनिहाय कोविड सहाय्यता कक्ष स्थापन केला असून त्यामध्ये दररोजची माहिती अपडेट केली जाते. अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोरोनाचा संसर्ग झाल्यास काय खबरदारी घ्यायला हवी, यासाठी मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. विभागीय संपर्क अधिकाऱ्यांचे क्रमांकही देण्यात आले आहेत. ती अपडेट माहिती वेळोवेळी आपल्या www.mahatransco.in या संकेतस्थळावरही व MSETCL COVID War Room या व्हॉटसअप ग्रुपवरही प्रसिध्द केली जाते.

सर्व परिमंडळातील कोविड सहाय्यता कक्षाशी दूरदृश्य प्रणालीव्दारे (व्हीडिओ कॉन्फरन्सिंग) सातत्याने प्रशासन संपर्क साधून कोविड-१९ महामारीबाबत कर्मचारी व कामगारांच्या मदतीसाठी काय करता येईल, याचा सातत्याने आढावा घेत आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांमध्ये झालेल्या संसर्गाची अद्ययावत आकडेवारी, त्यांची देखभाल (Hospital/ Home) संदर्भात माहिती, या व्हॉटसअप ग्रुपमध्ये सर्व महाराष्ट्रातील मुख्य अभियंते व मुख्य कार्यालयीन विभागप्रमुख सहभागी आहेत. या व्हॉटसअप ग्रुपचे नियंत्रण स्वतः मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ व्यवस्थापन करते. विलगीकरण कक्ष, लसीकरण, सानुग्रह सहाय्यबाबत माहिती व मार्गदर्शन करण्यात येते. यामध्ये कर्मचाऱ्याचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास त्याच्या वारसांना रूपये तीस लाखांचे सानुग्रह सहाय्य देण्याची जी तरतूद महापारेषणने केली आहे. ती पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येतो.




कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी मेडिक्लेम इन्शुरन्सची मुदत कंपनीने एक वर्षाने वाढवून घेतली आहे. त्या अन्वये अधिकारी व कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना वार्षिक पाच लाखांपर्यंत रूग्णालयात मोफत उपचार घेता येणार आहेत. आपल्या अधिकारी व कर्मचारी बांधवांना लसीकरण प्राधान्याने मिळावे, याकरिता मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्राव्दारे आवाहन केले आहे. त्यानुसार संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना लसीकरण शिबिर घेण्याकरिता प्रशासनाने सर्व परिमंडळातील मुख्य अभियंत्यांना निर्देश दिले आहेत. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आतापर्यंत ४९ टक्के लसीकरण केले आहे. लवकरच ते १०० टक्के करण्याचा कंपनीचा मानस आहे. तसेच पुढे जाऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांनाही लसीकरण करण्याचा कंपनीचा मानस आहे. या कठीण काळात आपल्या अधिकारी/कर्मचारी यांचे शारीरिक, मानसिक आरोग्य चांगले ठेवण्याकरिता त्यांना आरोग्य/मानसिक कार्यक्रमाचे आभासी (Virtual) पध्दतीने आयोजन करण्यास सुचित केले आहे.

केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळी जारी केलेले नियम व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून, सामाजिक अंतर राखून (Social Distancing) आपली कामे पूर्ण करावयाची आहेत. तसेच अनलॉकच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या ब्रेक द चेनच्या महाराष्ट्र शासनाच्या व कंपनीच्या निर्देशांचे तंतोतंत पालन करावयाचे आहे.

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**


संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.


The Company accepts no responsibility for the matter published in the journal.